**महाराष्ट्र जनशक्ती** ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअ‍ॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : ८९ वे | दिनांक : २३/०३/२०२६ | वार : सोमवार

## अजितदादांनी चाकणकरांचा राजीनामा मागितला होता; पण तटकरेंनी थांबवला - रूपाली ठोंबरे



**पुणे :** नाशिकच्या भोंदू 'कॅप्टन' अशोक खरात प्रकरणाने आता केवळ सामाजिकच नव्हे, तर राजकीय क्षेत्रालाही हादरवून सोडले आहे. खरातसोबतचे फोटो व्हायरल झाल्यानंतर रूपाली चाकणकर यांनी महिला आयोगाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला असला, तरी त्यांच्या अडचणी कमी होताना दिसत नाहीत. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या नेत्या रूपाली ठोंबरे पाटील यांनी आता थेट चाकणकर यांच्यावर अशोक खरातच्या 'सेक्स रॅकेटच्या मास्टरमाईंड' असल्याचा गंभीर आरोप करत त्यांच्या अटकेची मागणी केली आहे. तसेच अजितदादांनी चाकणकरांचा राजीनामा मागितला होता. पण सुनील तटकरेंनी तो थांबवला, असा मोठा दावाही ठोंबरे पाटील यांनी केलाय.

एबीपी माझाशी संवाद साधताना रूपाली ठोंबरे पाटील यांनी अशोक खरात प्रकरणी आक्रमक पवित्रा घेतला. त्या म्हणाल्या, "मी ही मागणी केवळ राजकीय नेत्या म्हणून नाही, तर एक वकील म्हणून करत आहे. अशोक खरात चालवत असलेल्या लैंगिक शोषणाच्या जाळ्याच्या मुख्य सूत्रधार रूपाली चाकणकर आहेत. अनेक महिलांनी खरातच्या विरोधात तक्रारी केल्या होत्या, मात्र चाकणकर यांनी आपल्या संविधानिक पदाचा गैरवापर करून ही सर्व प्रकरणे दडपून ठेवली."

रूपाली ठोंबरे यांनी यावेळी दिवंगत नेते अजित पवार यांचा संदर्भ देत खळबळ उडाली. "या प्रकरणातील सर्व 'कटू सत्य' अजित दादांना माहीत होते. दादांनी यापूर्वीच रूपाली चाकणकर यांचा राजीनामा मागितला होता, मात्र सुनील तटकरे यांनी मध्यस्थी करून तो राजीनामा रोखून धरला," असा मोठा दावा त्यांनी केला. "अजित दादा आज आपल्यात असते तर त्यांनी अशा भोंदूगिरीला आणि त्यांना साथ देणाऱ्यांना छडीच्या तालावर सरळ केले असते. दादांना त्यांच्या शेवटच्या काळात कोणी कोणी त्रास दिला, हे मी लवकरच नावानिशी जाहीर करेन," असा इशाराही त्यांनी यावेळी दिला.

पुण्यातील एका ब्लॅकमेलिंग प्रकरणाचा उल्लेख करत रूपाली ठोंबरे म्हणाल्या की, अशोक खरातला दोन मुले ब्लॅकमेल करत होती आणि त्या व्यवहारातही तडजोड करण्यात आली होती. "एसआयटीने या प्रकरणातील सामाजिक कार्यकर्त्यांची आणि सूत्रधारांची नावे जाहीर केली नाहीत, तर आम्ही उच्च न्यायालयात 'रिट याचिका' दाखल करू. देवेंद्र फडणवीस कोणालाही वाचवणार नाहीत, याची मला खात्री आहे," असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. रूपाली चाकणकर यांनी अशोक खरातसाठी छत्री धरल्याचा आणि त्यांची पाद्यपूजा केल्याचा फोटो व्हायरल झाल्यानंतर विरोधकांनी त्यांच्यावर टीकेची झोड उठवली होती. या फोटोंनी खरात आणि चाकणकर यांच्यातील घनिष्ठ संबंध अधोरेखित केल्याचे ठोंबरे यांनी म्हटले आहे. चाकणकर यांच्या काळात राज्य महिला आयोग खरोखर कोण चालवत होते? असा प्रश्न आता या आरोपांमुळे उपस्थित झाला आहे.

## यूट्यूबवर शिकून वॉर्डबॉयने केली लिंगनिदानाची चाचणी

**छत्रपती संभाजीनगर :** नारेगाव भागात उघडकीस आलेल्या बेकायदा गर्भपात आणि लिंगनिदान प्रकरणात एमआयडीसी सिडको पोलिसांनी शनिवारी (२१ मार्च) पिसादेवी भागात सापळा रचून मुख्य सूत्रधार डॉ. सतीश सोनवणे याच्या दोन खास हस्तकांना अटक केली. राहुल माणिकराव झोंड (२८, रा. मयूर पार्क), सोमनाथ परसराम बारसे (३१, रा. कमळापूर, वाळूज) अशी आरोपींची नावे आहेत. यातील आरोपी राहुल केवळ बारावी उत्तीर्ण असून, तो यूट्यूबवरून लिंगनिदान करण्याचे शिकला होता. या टोळीतील सदस्य व्हॉट्सअ‍ॅप कॉलच्या माध्यमातून परस्परांच्या संपर्कात होते.

एमआयडीसी सिडको ठाण्याचे निरीक्षक सोमनाथ जाधव, सहायक निरीक्षक कैलास लहाने यांनी सापळा रचला. पोलिसांनी एका महिला कर्मचाऱ्याला डमी पेशंट बनवून आरोपींशी संपर्क साधला. गर्भपात करायचा आहे, असे आरोपींना सांगितले. त्यावर आरोपीने १४ हजार रुपयांत तपासणी करण्यात येईल, असे सांगितले. पोलिसांनी होकार देताच आरोपी पिसादेवीला आले अन् पोलिसांच्या सापळ्यात अडकले. आरोपी राहुल झोंड आणि सोमनाथ बारसे शनिवारी कारमधून येताच दबा धरून बसलेल्या पोलिसांनी त्यांना झडप घालून पकडले. त्यांच्याकडून विदेशी बनावटीचा पोर्टेबल सोनोग्राफी 'प्रोब' आणि एक टॅब आणि एक कार जप्त केली आहे. ही कारवाई गणेश डोइफोडे, देविदास काळे यांच्या पथकाने केली.

या प्रकरणातील मुख्य सूत्रधार डॉ. सतीश सोनवणे आणि महालॅब कर्मचारी महिलेचा पती सपकाळ हे दोघेही अद्याप पोलिसांच्या हाती लागलेले नाहीत. सपकाळ हा या साखळीतील महत्त्वाचा दुवा असून तो आणि डॉ. सोनवणे मिळून हे रॅकेट चालवत होते. पोलिस आता या दोघांच्या मागावर असून त्यांच्या अटकेनंतर शहरातील अनेक बड्या रुग्णालयांचे आणि लॅबचे धाबे दणाणले आहे.

मुख्य सूत्रधार डॉ. सतीश सोनवणेच्या टोळीत आरोपी राहुल झोंड आणि सोमनाथ बारसे हे दोघे काम करत होते. सोनवणेला पोलिसांनी अटक केली आणि हर्सूल जेलमध्ये पाठवले. त्या वेळी या दोघांनी त्याच्याकडे असलेले 'प्रोब' स्वत:कडे घेतला. बाहेरील काम पाहण्यासाठी त्याच्याकडे विदेशी 'प्रोब' सोपवला. राहुल झोंड शहरातील एका नामांकित रुग्णालयात वॉर्डबॉय आणि ओटी असिस्टंट म्हणून काम केल्याने त्याला वैद्यकीय क्षेत्राची जुजबी माहिती होती. उर्वरित ज्ञान त्याने यूट्यूबवरून मिळवले. सोमनाथ बारसे दहावी उत्तीर्ण असून तो डॉ. सोनवणेचा जुना चालक आहे. टॅब हाताळणे आणि लोकेशन शोधण्यात तो पटाईत आहे.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा. संपर्क क्र. 7588005002

## २१ व्या शतकातील युद्ध दुर्दैवी 'युद्ध नको, बुद्ध हवा' संदेश जगासाठी महत्त्वाचा - रामदास आठवले

**पुणे :** केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी सध्या जगभरात सुरू असलेल्या युद्धग्रस्त परिस्थितीवर चिंता व्यक्त केली आहे. एकविसाव्या शतकात सुरू असलेली युद्धे दुर्दैवी असून, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा 'युद्ध नको, बुद्ध हवा' हा संदेश जगासाठी अत्यंत महत्त्वाचा असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले.

आठवले यांच्या हस्ते पद्मपाणी फाउंडेशन आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पाली व बौद्ध अध्ययन विभागामार्फत आयोजित दुसऱ्या पाली साहित्य संमेलनाचे उद्घाटन झाले.

यावेळी बनारस हिंदू विश्वविद्यालयाचे पाली विभागाचे प्रमुख आणि संमेलनाध्यक्ष प्रा. डॉ. बिमलेन्द्र कुमार, गगन मलिक, भदंत हर्षबोधि महाथेरो, डॉ. योजना भगत, उपमहापौर परशुराम वाडेकर, धम्मदीप वानखेडे, डॉ. करुणा जाधव, डॉ. नीरज बोधी, सारंग आव्हाड, स्वागताध्यक्ष डॉ. सिद्धार्थ धेंडे, डॉ. गौतम चाबुकस्वार, संयोजक राहुल डंबाळे, सुवर्ण डंबाळे आणि आरपीआयचे प्रदेशाध्यक्ष राजाभाऊ सरवदे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

आठवले म्हणाले की, पाली भाषेने जगाला विज्ञानवाद, समानता, मानवता आणि शांततेचे ज्ञान दिले आहे. बौद्ध तत्त्वज्ञान याच भाषेतून जगभर पोहोचले. पाली भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा यासाठी आपण प्रयत्न केले असून, यापुढेही तिच्या प्रचार आणि प्रसारासाठी शासकीय पातळीवर सर्वतोपरी मदत केली जाईल, अशी ग्वाही त्यांनी दिली. जगभरातील युद्धस्थिती, सामाजिक असमानता आणि हिंसाचार दूर करण्यासाठी पाली भाषेचा प्रसार आवश्यक असल्याचे मतही त्यांनी व्यक्त केले.

संमेलनाध्यक्ष प्रा. डॉ. बिमलेन्द्र कुमार यांनी सांगितले की, गौतम बुद्धांचे तत्त्वज्ञान आणि समृद्ध भारतीय परंपरेचे भांडार पाली भाषेत उपलब्ध आहे. दु:खातून बाहेर पडून समाधान प्राप्त करण्याचा आणि चित्तशुद्धीचा मार्ग पाली भाषेने दाखवला आहे. त्यामुळे शालेय अभ्यासक्रमात पाली भाषेचा ऐच्छिक भाषा म्हणून समावेश होणे आवश्यक आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २३ मार्च २०२६


## किनगाव राजा येथे रमजान ईद उत्साहात साजरी





**किनगाव राजा (शेख कदीम) :** किनगाव राजा येथे रमजान ईद (ईद-उल-फित्र) मोठ्या श्रद्धा, उत्साह आणि आनंदात साजरी करण्यात आली. मुस्लिम समाजासाठी अत्यंत पवित्र असलेला हा सण आज दिनांक २१ मार्च २०२६ रोजी मोठ्या उत्साहात पार पडला.काल सायंकाळी चंद्रदर्शन झाल्यानंतर किनगाव राजा येथील जामा मस्जिदचे मोलवी मियाभाई यांनी माईकवरून ईद आज सकाळी 9 वाजता साजरी करण्यात येईल, अशी घोषणा केली होती. त्यानुसार आज सकाळी ईदगाह मैदानावर मुस्लिम बांधवांनी नवीन कपडे परिधान करून मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. काही जण पायदळ तर काही जण वाहनांद्वारे ईदगाहवर दाखल झाले.यावेळी मौलाना मियाभाई यांच्या हस्ते ईदची विशेष नमाज अदा करण्यात आली. रमजान महिन्यातील उपवासानंतर आलेल्या या आनंदोत्सवात बंधुभाव, एकता आणि सामाजिक सलोखा यांचे सुंदर दर्शन घडले.नमाज पठणानंतर PSI मोहन गीते, आनिल नागरे (बीट जमदार) आणि विश्वास काकड यांनी मुस्लिम बांधवांना पुष्पगुच्छ देऊन ईदच्या शुभेच्छा दिल्या.या प्रसंगी मुक्तार शेख, अकिल कुरेशी फिरोज शेख, लतिफ कुरेशी, इसाक कुरेशी, आफ्रोज शेख, अफ्रोज पठाण, राजू कुरेशी,सलीम पठाण, इरफान पठाण,फारुख कुरेशी, असिफ कुरेशी, अशपाक कुरैशी,अल्ताफ कुरेशी, आसेफ पठाण, वसीम कुरेशी, लूकमान शेख, मोहसिम शेख, सद्दाम शेख, कदीम शेख, रहेमान शेख, सल्लुद्दीन शेख, मोजीम शेख, नाजिम शेख, उमेद पठाण, हकीम पठाण, शेख आक्रम यांच्यासह मुस्लिम समाजातील अनेक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.नमाजानंतर गावभर एकमेकांना गळाभेट देत ईदच्या शुभेच्छा देण्याचा आनंदोत्सव रंगला. लहान मुलांनी शीरखुर्याचा आस्वाद घेत ईदचा आनंद अधिकच द्विगुणित केला.

## ज्या कवितेत भावना मोहरून रडते, ती कविता दर्जेदार असते - कवी अय्युब पठाण लोहगावकर



**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** : छतत्रपती संभाजीनगर शहराजवळ असलेल्या मीटमीटा येथील सरोश मराठी प्राथमिक शाळेत शुक्रवारी कविता दिनाचे औचित्य साधून प्रसिध्द कवी अय्युब पठाण लोहगावकर यांनी कविता वाचनांचा कार्यक्रम घेतला. या कार्यकमात अय्युब पठाण यांनी प्रारंभी विद्यार्थी यांना बाल कविता चालीवर गाऊन दाखविल्या. त्यानंतर कविता कशी लिहावी याची माहिती दिली. काही विनोदी चारोळ्यांचे सादरीकरण करून मुला-मुलींना भरपूर हसविले. आणि शेवटी सांगितले की, " कविता काय असते? कविता म्हणजेच ज्या कवितेत भावना मोहरून रडते ती कविता चांगली असते. प्रत्येक काळजाचे आभाळ होत नसते तर शब्दांना रक्तांचे अमृत पाजावे लागते ती कविता असते. कथेविषयी सांगितले," ज्या कथेत असती व्यथा ती कथा चागली असते." शेवटी "आई," ही करूणरसातील संगीतमय कविता मधूर आवाजात सादर केली. ही कविता ऐकूण सर्वांचे डोळे पाणावले. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून रामपाटील एरंडे, तसेच मुख्याध्यापक समीर पठाण शिक्षक अशरफ पठाण, इरफान पठाण, शेख युनूस, इरफान देशमुख यांच्यासह विद्यार्थी व परीसरातील पालकवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त राज्यस्तरीय निबंध स्पर्धेचे विशेष आयोजन



**जालना :** सम्राट अशोक शिक्षण संस्था भोकरदन, जि. जालना यांच्याद्वारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त राज्यस्तरीय निबंध स्पर्धेचे विशेष आयोजन करण्यात आले आहे.स्पर्धेचे गट आणि विषय:गट १ : इयत्ता ८ वी ते १२ वी (शब्दमर्यादा: १००० ते १५००) मला समजलेले बाबासाहेब आंबेडकर* माझी प्रेरणा: डॉ. बाबासाहेब आंबेडकर* सामाजिक बंधुत्वासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची गरजगट २ : पदवी ते पदव्युत्तर (शब्दमर्यादा: १५०० ते २०००)* वर्तमान समाजास-मोरील आव्हाने आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची गरज* राष्ट्रबांधणीसाठी डॉ. बाबासा-हेब आंबेडकरांच्या विचारांची प्रस्तुतता तरुणांचे प्रेरणास्थान: डॉ. बाबासाहेब आंबेडक-रपुरस्कार (दोन्ही गटांसाठी):* प्रथम: ₹ ७,००० रोख + सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र आणि भारतीय संविधानाची प्रत* द्वितीय: ₹ ५,००० रोख + सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र आणि भारतीय संविधानाची प्रत* तृतीय: ₹ ३,००० रोख + सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र आणि भारतीय संविधानाची प्रत* उत्तेजनार्थ प्रत्येकी तीन बक्षिसे ५०० /- प्रमाणपत्र आणि भारतीय संविधानाची प्रत महत्त्वाच्या अटी व नियम: या स्पर्धेकरीता कोणतेही प्रवेश शुल्क नाही निबंध मराठी, हिंदी किंवा इंग्रजी या भाषेतून लिहिलेला असावा. निबंध स्वहस्ताक्षरात, कोऱ्या किंवा रजिस्टर पेजवर एकाच बाजूने लिहिलेला असावा. मूळ निबंधावर नाव लिहू नये. एका स्वतंत्र कागदावर विद्यार्थ्यांनी निबंध स्वत: लिहिल्याचे नमूद करून स्वत:चे पूर्ण नाव / वर्ग, पत्ता व संपर्क क्रमांक, शाळेचे संपूर्ण नाव आणि मुख्याध्यापक / प्राचार्य यांची सही / शिक्का घेऊन बंद लिफाफ्यात दिलेल्या पत्त्यावर पाठवावा. निबंध पाठविण्याचा अंतिम दिनांक: ३० एप्रिल २०२६ निबंध पाठविण्याचा पत्ता : मा. सुदामराव सदाशिवे, समर्थ नगर, सतकर कॉम्प्लेक्सच्या मागे, अंबड रोड, जालना. जिल्हा- जालना (महाराष्ट्र ) पिन- ४३१२०३ संपर्क : ९८३४१३३७२८निकाल व पारितोषिक वितरणाची माहिती प्रसिद्धी माध्यमाद्वारे व वैयक्तिकरित्या कळविली जाईल.असे आयोजक, दीपक सुदामराव सदाशिवे, सचिव, सम्राट अशोक शिक्षण संस्था, भोकरदन, जि. जालना, प्रा. डॉ. प्रियदर्शन भवरे, संपर्क : ९४०५९१३२९७ आणि चंद्रशेखर बोर्डे : ८६६८७३६०९४यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

## प्रा. गौरी फराह वाणिज्यशास्त्र विभागप्रमुखपदी



**छत्रपती संभाजीनगर :** डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील वरिष्ठ प्राध्यापक डॉ.फराह नाझ गौरी यांची वाणिज्यशास्त्र विभागप्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली आहे. डॉ वीणा हुंबे यांनी यांच्याकडून त्यांनी पदभार घेतला. मा. कुलगुरू डॉ विजय फुलारी यांनी सदर नियुक्ती केली डॉ.फराह गौरी या गेल्या तीस वर्षापासून विभागात कार्यरत आहेत. यावेळी डॉ.सय्यद अझरुद्दीन य डॉ जयश्री सूर्यवंशी, डॉ विलास इप्पर, डॉ राजेश लहाने, डॉ अपर्णा भोंडे, डॉ ठोंबरे, डॉ भाऊसाहेब शिंदे आणि विद्यार्थी उपस्थित होते.


**प्रतिनिधी नेमणे आहे**

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राध्यान्य! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.


## निधनवार्ता



**हिंगोली :** बुध्दवासी गिताबाई नारायण पुंडगे रा.लोहरा (वाणी) ता. जि. हिंगोली ह.मु. प्लॉट नं.१३ एस.टी.कॉलनी सिडको एन -२ छत्रपती संभाजीनगर यांच अल्पशा आजाराने एम.जी.एम. रुग्णालय छत्रपती संभाजीनगर येथे उपचार दरम्यान १० फेब्रुवारी २०२६ रोज मंगळवार रात्री १:२० वाजता दुखंत निधन झाले मृत्यु समय त्यांच ८३ व्या वर्षी या जगाचा आखेरचा श्वास घेतला त्या प्राचार्य प्रा.संतोष नारायण पुंडगे यांच्या मातोश्री होत्या....त्यांच्या पाश्चात्य मुलगे, एक मुलगी सुना नातवंडे असा मोठा पुंडगे परीवार आहे.......!!!भावपूर्ण श्रद्धांजली!!!


**बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002**

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २३ मार्च २०२६

## मी मनीमाऊ

ओळखलं का मला
मी आहे मनीमाऊ
उंदराची पिल्लं
माझा आवडता खाऊ

गुपचूप गुपचूप
घरात मी येते
कुठं काय ठेवलं
याचा कानोसा घेते

अपशकून मानू नका
माझे आडवे जाणे
मनातून काढून टाका
अंधश्रद्धेचे रडगाणे

वाघाची मावशी म्हणून
माझी सर्वत्र ख्याती
पण बोबडी वळते
समोर दिसता मोती

चोरून दूध पितांना
पांढरी होते मिशी
पैसे नाही जवळ
पार्लरमध्ये जावू कशी?



**- रवींद्र चालीकवार**
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.९०११५५९१०६

## काल कविता दिन होता

काल म्हणे कविता दिन होता
पण दिवसभराच्या धावपळीत
कविता जगत असताना
कळलंच नाही मला
की काल कविता दिन होता..

खरं तर
वेदना अन् कविता
सोबत नांदतात
माझ्या घरी,दारी अन् श्वासात

कविता कागदावर येण्याआधी
रुजत असते काळजात
अल्लड लेकीसारखी
नाचत असते घरात..

मी पाहिली कविता
मायबापासोबत
रानावनात राबताना
झळा उन्हाच्या सोसताना
दुष्काळाच्या छाताडावर
पाय रोवून लढताना..

मी पाहिली कविता
हिरव्यागार पिकामध्ये
धुडगूस घालताना
रानवाऱ्याच्या सोबत
शिवारभर फिरताना..

बाभळीच्या काट्यातले
सुंदर फुलं शोधताना
पाखरांच्या चोचीतून
आकाशभर पसरताना

मी लिहिली कविता
रानात वखर हाकताना
झोपेत स्वप्न पडताना
तंद्रीत जागा असताना..

मी लिहिली कविता
काळजाच्या तगमगीतून
भरलेल्या आभाळाला
रीतं-रीतं करण्यासाठी
आयुष्याच्या जखमेवर
मलम थोडा लावण्यासाठी..

**- ज्ञानेश्वर गायके,**
**कन्नड**

# दौलताबाद येथे ईद उल फित्र उत्साहात साजरी




**दौलताबाद (आवेद अहमद)** : रमजान चे ३० उपवास पूर्ण होऊन शुक्रवारी रोजी चंद्रदर्शन झालेदि २१ शनिवारी ईद उल फित्र साजरी करण्यात आलीसकाळ पासून मोठ्या संख्येने लोक नमाज पठण करण्यासाठी माळीवाडा येथील ऐतिहासिक शाही ईदगाह येथे नमाज अदा करण्यासाठी जमा झाले होतेसकाळी नऊ वाजता नमाज अदा करण्यात आलीही नमाज अब्दीमंडी जामा मशीद चे इमाम हाफीज मसूद रशीद यांनी नमाज व कुतब पढवला तर जामा मशिद चे इमाम हाफिज सैफोदिन यांनी नमाज नंतर सामूहिक दुवा केली अल्हा कडे जगात सुखसमृद्धी नांदो,शांततेच्या मार्गावर चालो, एकमेकांवर भाईचारा राहो, एकमेकांवर प्रेम असो,तरुण पिढीला व्यसनमुक्ती मिळो, महिला ना आदर मिळो,आई वडिलांच्या सेवा घडो,गुन्हेगारी पासून मुक्ती मिळो अशी दुवा करण्यात आलीईद नमाज साठी दौलताबाद, अब्दीमंडी, आसेगाव, फतीयाबाद, माळी-वाडा, परिसरातील लोक सहभागी झाले होतेनमाज साठी येणाऱ्या लोकांना दौलताबाद पोलीस निरीक्षक रेखा लोंढे, उपनिरीक्षक वाघ व कर्मचारी यांनी गुलाब पुष्प देऊन ईद च्या शुभेच्छा दिल्यायावेळी माजी सरपंच सैय्यद हारून,उपसरपंच ग्रा प स सैय्यद मतीन,सैय्यद शेरू,सैय्यद राझिक,शेख बाबा, इस्माईल पठाण,सैय्यद जमिल, शेख मुकतार, शेख लाला,शेख जफर, सत्तार लोखंडवाला आदिंची प्रमुख उपस्थिती होती

# बामणी येथे छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर उत्साहात संपन्न



**जिंतूर (बी.डी.रामपूरकर) :** महाराष्ट्र शासनाच्या महसूल विभागामार्फत प्रशासन अधिक लोकाभिमुख करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेले "छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर" बामणी मंडळात दिनांक २० मार्च रोजी ग्रामपंचायत कार्यालय बामणी येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले.उपविभागीय अधिकारी सेलू मा. शैलेश लाहोटी यांच्या मार्गदर्शनाखाली या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिंतूरच्या तहसीलदार मा. शितल कच्छवे या होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून नायब तहसीलदार प्रशांत राखे, तालुका कृषी अधिकारी नितीन घुगे, उपसरपंच सुनीताबाई जाधव (बामणी), सरपंच सावित्रीबाई घोगरे (करंजी), उपसरपंच नारायण राठोड (असोला), सरपंच लक्ष्मीबाई जाधव (अंगलगाव) तसेच सरपंच भीमराव वाकळे (पिंपळगाव काजळे) उपस्थित होते.यावेळी बामणी मंडळाच्या मंडळ अधिकारी श्रीमती आरती शेळके, सर्व ग्राम महसूल अधिकारी, ग्रामसेवक, कृषी सहाय्यक, प्रतिष्ठित नागरिक व मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.शिबिरामध्ये नागरिकांना विविध महसूल सेवा तत्काळ उपलब्ध करून देण्यात आल्या. यामध्ये प्रमाणपत्रे व विविध दाखले, ७/१२ व ८-अ उतारे, फेरफार प्रकरणे, नोंदीतील चुका दुरुस्ती, जमीन अभिलेख अद्ययावत करणे तसेच अकृषिक (NA) संदर्भातील मार्गदर्शन यांचा समावेश होता. तसेच जमीन विषयक प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करण्यात आला.यासोबतच नागरिकांना विविध शासकीय योजनांची माहिती देत सामाजिक योजनांचा लाभ, ई-मोजणी अर्ज प्रक्रिया, तसेच पी.एम. किसान नोंदणीबाबत मार्गदर्शन करण्यात आले.शिबिरात आरोग्य, कृषी, मुद्रांक व नोंदणी, पुरवठा आदी विभागांनी स्वतंत्र माहिती कक्ष उभारून नागरिकांना सविस्तर माहिती दिली. तहसीलदार शितल कच्छवे यांनी शासनाच्या विविध योजनांची माहिती देत नागरिकांना त्याचा लाभ घेण्याचे आवाहन केले.या शिबिराला नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून विविध सेवांचा लाभ घेतला. एकूणच हा उपक्रम अत्यंत यशस्वीरीत्या पार पडला.

# समाजसेवक ज्ञानदेव पायगव्हाणे यांना सेवाभावी सेवक पुरस्कार प्रदान



**जालना (प्रा डॉ राजेंद्र सोनवणे) :** जालना येथील ज्येष्ठ समाजसेवक व ज्येष्ठ पत्रकार श्री ज्ञानदेव पायगव्हाणे यांना लायन्स क्लब ऑफ जालना, रॅपिड क्लब तर्फे राबवण्यात आलेल्या, अनाथ बालके, गरीब विद्यार्थ्यांना मदत केल्याबद्दल, महिला व बाल रुग्णालयात मोफत भोजन व्यवस्था करून दिल्याबद्दल, लायन्स नेत्रालयात भरीव मदत दिल्याबद्दल आदी विविध समाज उपयोगी उपक्रमात आतापर्यंत जालना व जिल्ह्यात केलेल्या उल्लेखनीय योगदानाबद्दल त्यांना लायन्स इंटरनॅशनल च्या वतीने समर्पित सेवाभावी" सेवक" पुरस्कार देण्यात आला. काल एका कार्यक्रमात लायन्स क्लबच्या प्रमुख अरुणा ओसवाल यांच्या हस्ते मानपत्र व स्मृतिचिन्ह देऊन श्री.ज्ञानदेव पायगव्हाणे यांचा गौरव व सत्कार करण्यात आला. याबद्दल जालना जिल्हा मराठा समाजा तर्फे व जालना जिल्हा ज्येष्ठ नागरिक संघातर्फे त्यांचे अभिनंदन करण्यात आले. श्री ज्ञानदेव पायगव्हाणे हे सेवाभावी व्यक्तिमत्व असून संपूर्ण जालना जिल्ह्यासाठी भूषणवहा कार्य त्यांनी केलेले आहे, विविध लोक कल्याणकारी समाज उपयोगी उपक्रमांमध्ये त्यांचा सहभाग असतो युवकांसाठी ते प्रेरणास्थान आहेत, असे त्यांच्याबद्दल गौरवउदगार डॉ पंजाबराव देशमुख महाविद्यालय शिक्षक संघटनेचे जिल्हाध्यक्ष प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे यांनी व्यक्त केले. लवकरच जालना जिल्हा "मराठा युवा मंच" तर्फे त्यांचा सत्कार करण्यात येणार असल्याचीही प्रा. डॉ .सोनवणे यांनी सांगितले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com


छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २३ मार्च २०२६


## शेतकरी, कष्टकऱ्यांच्या पाठीशी कवींनी उभ राहावं :विश्वास पाटील 'दु:खी', ना.धों.महानोर राज्य पुरस्कारांचे थाटात वितरण



**जालना (प्रतिनिधी) :** १९ मार्च १९८६ ला पहिली शेतकऱ्याची आत्महत्या झाली होती. १९९६ ते २०२२ या काळात ९६ हजार २४० शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. दरवर्षी सरासरी दोन शेतकरी आत्महत्या करत आहेत. समाज स्वास्थ्यासाठी हा कलंक असून आज खंडीभर काव्य लिहिलं जातंय प्रेयसी, चांदणी तीच गाणी केव्हापर्यंत लिहिणार ?,प्राध्यापक कुटुंबा पुरते जगतात. राजकारणी पुढच्या पिढ्यांसाठी इतरांची पाय कापत आहेत. वेदनेला जात नसते.शेतकरी, कष्टकऱ्यांच्या पाठीशी कवी, साहित्यिकांनी उभ राहणं गरजेच आहे.असे परखड मत ज्येष्ठ साहित्यिक विश्वास पाटील यांनी व्यक्त केले. "दु:खी" राज्य काव्य आणि ना. धों. महानोर राज्य साहित्य पुरस्कारांचे वितरण गुरुवारी ( ता.१९) सायंकाळी जे. ई. एस. महाविद्यालयाच्या प्रांगणात आयोजित "कवितेचा पाडवा" या कार्यक्रमात विश्वास पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.प्रसिद्ध उर्दु शायर राय हरिश्चंद्र साहनी यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दिला जाणारा "दु:खी" राज्य काव्य पुरस्कार कवी अशोक नायगावकर (रोख २५ हजार रूपये) यांना तर ना. धों. महानोर राज्य साहित्य पुरस्कार (रोख १० हजार रूपये) ,ज्येष्ठ ललित लेखिका डॉ .मीनाक्षी पाटील यांना प्रदान करण्यात आला. यावेळी अभय साहनी,विनीत साहनी, डॉ. संजीवनी तडेगावकर, पंडितराव तडेगावकर यांची प्रमुख उपस्थिती होती.विश्वास पाटील याप्रसंगी म्हणाले, कवी हा शब्दसृष्टीचा जादूगार असतो. जटिल प्रश्न, समस्या समजून घेतात. शब्दांच्या इज्जतीसाठी स्वातंत्र्यानंतर एका कवीने तुरुंगवास भोगला असे त्यांनी सांगितले. सत्कारास उत्तर देतांना डॉ .मीनाक्षी पाटील यांनी बालपणापासून ते आतापर्यंत मिळालेल्या पुरस्कारांचा आनंद, जगण्याची धडपड आणि समाधान व्यक्त करत पुरस्काराची रक्कम धुळे येथील वि. का. राजवाडे संस्थेस देण्याची घोषणा त्यांनी केली.कवी, लेखक, कलावंत कृतीतून भूमिका घेत असतात . संघर्ष हा जगण्याचा स्थायी भाव असून कमी अधिक तीव्र असतो.आपल जगण हीच कविता असल्याचे त्यांनी नमूद केले.डॉ.संजीवनी तडेगावकर यांनी पुरस्कार प्राप्त कवी, लेखकांचा परिचय देत माणसांना उगवून येण्यासाठी सुरू असलेल्या कवितेच्या पाडव्याची वाटचाल विषद केली.विनीत साहनी यांनी स्वागतपर मनोगतात रसिकांची शक्ती,दाद आम्हाला बळ देते. सध्या युध्दाची धग कोणी विझवू शकेल पण कवितेतून लागणारी आग विझविण्याची हिंमत कोणात नाही असे सांगितले. निवेदन कवी धम्मपाल जाधव यांनी केले तर पंडितराव तडेगावकर यांनी आभार मानले.चित्रकार श्रीधर अंभोरे, छायाचित्रकार ज्ञानेश्वर गिराम, राहुल चक्रे, राजेंद्र पाटील यांचा यावेळी सत्कार करण्यात आला.पावसाचे वातावरण असतांनाही रसिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती .कार्यक्रम स्थळी पक्षीमित्र ज्ञानेश्वर गिराम यांच्या पक्षांचे छायाचित्र प्रदर्शन भरविण्यात आले. चौकट जगण्याच सौंदर्य शिकलं पाहिजे: नायगावकर आपल्या आजूबाजूलाच असलेल्या सौंदर्याचा आस्वाद आपण घेत नाही मॉल मधील वस्तूंना आम्ही विकले गेलो . फुलांचे वास विसरलो, पानांची पालवी पाहत नाही. परंपरेन जगण्यातील शूचिर्भुतता सोडून आधुनिक वस्तूंच्या आहारी गेल्याने जगण्यापासून दूर गेलो असे खुसखुशीत मनोगत कवी अशोक नायगावकर यांनी व्यक्त केले इसराइल पॅलेस्टाईन मध्ये जर कवी असते तर आजच युद्ध झालं नसतं ,असे सांगून. कवी विश्वाचा असून संत परंपरा दिलेल्या मराठवाड्यात जाती-पातीचे सोडून ये हृदयीचे ते हृदयी ही भूमिका घ्यावी अशी अपेक्षा नायगावकर यांनी व्यक्त केली.

## पुस्तकांशी मैत्री



माणसाच्या आयुष्यात मित्रांना खूप महत्त्व असते. पण पुस्तकांसारखा खरा, शांत आणि विश्वासू मित्र दुसरा कोणी नसतो. पुस्तकं कधीच आपल्याला सोडून जात नाहीत. आपण जेव्हा हवे तेव्हा ती आपल्यासोबत असतात. त्यामुळे पुस्तकांशी मैत्री करणे खूप आवश्यक आहे.पुस्तकं आपल्याला अनेक नवीन गोष्टी शिकवतात. आपण वाचत असताना आपले ज्ञान वाढते आणि विचार करण्याची क्षमता सुधारते. वेगवेगळ्या विषयांची पुस्तकं वाचल्यामुळे आपल्याला जगाबद्दल अधिक माहिती मिळते. गोष्टींच्या पुस्तकांमुळे आपली कल्पनाशक्ती वाढते, तर माहितीपर पुस्तकांमुळे आपले समज अधिक मजबूत होतात.वाचनाची सवय लहानपणापासून लावली, तर ती आयुष्यभर उपयोगी पडते. सुरुवातीला लहान कथा, चित्रांसह पुस्तकं किंवा आपल्या आवडीच्या विषयांवरील पुस्तकं वाचायला घेतली, तर वाचन सोपं आणि आनंददायी वाटतं. रोज थोडा वेळ वाचनासाठी दिला, तर ही सवय हळूहळू मजबूत होते. त्यामुळे मन शांत राहते आणि एकाग्रता वाढते.आजकाल मोबाईल, टीव्ही आणि इंटरनेटमुळे अनेक जण वाचनापासून दूर जात आहेत. मोकळा वेळ मिळाला की लगेच फोन वापरला जातो. पण हा वेळ जर आपण पुस्तकांसाठी दिला, तर त्याचा अधिक फायदा होतो. पुस्तकं आपल्याला चांगले विचार देतात आणि आपल्याला योग्य मार्ग दाखवतात.पुस्तकांशी मैत्री केल्यामुळे आपण अधिक समजूतदार आणि विचारशील बनतो. आपण चांगल्या सवयी अंगीकारतो आणि इतरांना समजून घेण्याची सवय लागते. त्यामुळे आपला स्वभावही चांगला बनतो.शेवटी, पुस्तकांशी मैत्री ही आपल्या आयुष्यातील एक सुंदर आणि महत्त्वाची गोष्ट आहे. ही मैत्री आपल्याला ज्ञान, आनंद आणि योग्य दिशा देते. म्हणून प्रत्येकाने पुस्तकांशी मैत्री करावी आणि या अनमोल मित्रांचा लाभ घ्यावा.



**- विठ्ठल जयवंतराव अनमुलवाड
परभणी**

## मुरुम रोटरीकडून बाजार रस्त्यावर खास शुद्ध व थंडगार पाण्याची सोय



**मुरुम (प्रा.सुधीर पंचगल्ले) :** येथील रोटरी क्लब मुरूम सिटीकडून सध्या मोठ्या प्रमाणात हवेतील तापमान वाढल्याने नागरिकांना शुद्ध थंडगार पाणी मिळावे. या सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून आठवडी बाजारात येणाऱ्या नागरिकांसाठी मुख्य रस्त्यावर खास रविवारी (ता. 22) रोजी पिण्याचे पाणी मिळावे यासाठी पाणपोईची सोय करण्यात आली. या परिसरातील विविध गावातून बाजाराकरिता येणाऱ्या वाड्या-वस्तीवरील बाळ-गोपाळ, अबालवृद्ध व नागरिकांना तात्काळ पाणी मिळावे या हेतूने या सामाजिक उपक्रमाचा तथा पाणपोईचा शुभारंभ महात्मा बसवेश्वर पतसंस्थेचे संचालक अमृत वरनाळे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी रोटरीचे माजी अध्यक्ष डॉ. नितीन डागा, प्रा. डॉ. महेश मोटे, उपप्राचार्य कल्लय्या स्वामी, रोटरीचे सचिव कल्लाप्पा पाटील, प्रा. डॉ. सुधीर पंचगल्ले, संतोष कांबळे, खुणे गुरुजी आदींसह नागरिक उपस्थित होते. यावेळी बाजारासाठी येणाऱ्या नागरिकांना रोटरी सदस्यांकडून पाणी वाटप करण्यात आले. सदर उपक्रमाची सोय मार्च-मे या तीन महिन्याच्या आठवडी बाजारादिवशी करण्यात येणार असल्याचे रोटरीचे सदस्य प्रकाश रोडगे यांनी यावेळी सांगितले. रोटरीकडून पाणपोई या सेवाभावी उपक्रमाचे नागरिकांमधून मोठे कौतुक होत आहे. फोटो ओळ : मुरूम, ता. उमरगा येथील बाजार रस्त्यावर रोटरीकडून पाणपोईचे उद्घाटन अमृत वरनाळे करताना नितीन डागा, महेश मोटे, प्रकाश रोडगे व अन्य.

## तुझा गोड गुलाबी मुखडा

आठवणीत सखीच्या, मी बेजार आहे
तिला पाहण्यासाठी मन आतुर आहे

सांग ना सखी तू कधी भेटणार मला
तुला भेटण्यास मन माझे आतुर आहे

तुझा गोड गुलाबी मुखडा पाहण्यास
मन माझे प्रिये कधीचा अधीर आहे

मनाला माझ्या वेड हे लागले गं कसे
गुपित मजला हे कोण सांगणार आहे

प्रेमाच्या या रणांगणात मीच जिंकणार
हेच मनाला मी ठासून सांगणार आहे

उठता बसता सदा सर्वदा तुझेच नाव
श्वास असेपर्यंत मी घेत राहणार आहे

शेवटच्या क्षणापर्यंत मी तुझीच वाट
चातकाप्रमाणे बघत बसणार आहे



**- नागेश बोंतेवाड,
छत्रपती संभाजीनगर**

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २३ मार्च २०२६


## वाढदिवसाचा खर्च टाळून शाळेला ११ हजारांची देणगी; मुख्याध्यापक कृष्णा शिंदे यांचा आदर्श उपक्रम




**छत्रपती संभाजीनगर :** वाढदिवस म्हणजे केवळ केक कापून किंवा पार्ट्या देऊन साजरा करण्याचा सोहळा, असाच सर्वसाधारण समज असतो. मात्र, औरंगपुरा येथील जिल्हा परिषद कन्या प्रशालेचे प्रभारी मुख्याध्यापक कृष्णा शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या मुलांनी समाजासमोर एक नवा आदर्श ठेवला आहे. वडीलांची प्रशालेला पुर्ववैभव प्राप्त करण्यासाठीची धडपड पाहून आपणही प्रशालेच्या भौतिक सुविधेसाठी योगदान द्यायला पाहीजेत हा उद्देश ठेवून आपल्या पॉकीटमनीच्या बचतीतून डॉ.अबोली व अभय शिंदे परिवाराने वाढदिवसाचा अनावश्यक खर्च टाळून शाळेच्या विकासासाठी ११ हजार रुपयांची रोख देणगी आणि विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य भेट दिले आहे. २० मार्च २०२६ रोजी पार पडलेल्या या छोटेखानी पण प्रेरणादायी कार्यक्रमात कृष्णा शिंदे, त्यांच्या सुविद्य पत्नी सुरेखा शिंदे, मुलगी डॉ.अबोली आणि मुलगा अभय यांनी ही मदत शाळेकडे सुपूर्द केली. या मदतीचा विनियोग शाळेतील गरजू व होतकरू विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सुविधांसाठी केला जाणार आहे.या देणगीतून शाळेतील विविध शैक्षणिक उपक्रमांना गती मिळणार आहे. विशेषत: गरीब कुटुंबातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणातील अडथळे दूर करण्यासाठी हे शैक्षणिक साहित्य महत्त्वपूर्ण ठरेल. सरकारी शाळांना लोकसहभागातून सक्षम करण्याच्या दृष्टीने शिंदे परिवाराने उचललेले हे पाऊल कौतुकास्पद मानले जात आहे.यावेळी शाळेतील शिक्षकवृंद सीमा बेगम, दादाराव गायकवाड, चेतना तायडे, मनीषा कोळी, ज्योती पवार, स्वप्नील लोखंडे, गजानन डफळ आणि तुषार चव्हाण यांनी शिंदे परिवाराचे कौतुक करून आभार मानले. वैयक्तिक आनंदाच्या क्षणी सामाजिक बांधिलकी जपणारा हा उपक्रम इतर अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठीही प्रेरणादायी ठरणार आहे.शिक्षणाप्रती असलेली निष्ठा आणि समाजाप्रती असलेले उत्तरदायित्व यातूनच अशा उपक्रमांची निर्मिती होते. शिंदे सरांच्या या पुढाकारामुळे शाळेच्या गुणवत्तेत भर पडेल,असा विश्वास वाटतो.

## आमदार सतीश चव्हाण यांच्या हस्ते डॉ. तुकाराम वांढरे यांच्या ग्रंथांचा प्रकाशन सोहळा संपन्न




**छत्रपती संभाजीनगर :** देवगिरी महाविद्यालयाच्या रवींद्रनाथ टागोर सभागृहातमराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे सरचिटणीस आमदार सतीशभाऊ चव्हाण यांच्या हस्ते या दोन्ही ग्रंथांचे प्रकाशन झाले. त्यांनी दोन्ही ग्रंथांचे कौतुक करून शैक्षणिक व संगीत क्षेत्रात या दोन्ही ग्रंथांची उपयुक्तता निश्चितच महत्त्वपूर्ण ठरणार आहे असे प्रतिपादन केले. आणि तुकाराम वांढरे यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. डॉ. तुकाराम वांढरे यांची दोन्ही पुस्तके अनमोल ठेवा ठरतील - डॉ. समाधान इंगळे 'पं. विष्णू नारायण भातखंडे यांच्या ऐतिहासिक आणि क्रांतिकारी कार्याचा एकत्रित आढावा हा संगीत विषयातील अभ्यासक आणि संशोधकांसाठी अतिशय अनमोल ठेवा राहील, तर सेवानिवृत्त वृद्धांच्या समस्या दूर करण्यासाठी डॉ. तुकाराम वांढरे लिखित दुसरे पुस्तक समाजातील प्रत्येक घटकासाठी मार्गदर्शक ठरेल. वृद्धांच्या समस्या या केवळ वृद्ध झाल्यानंतरच्या समस्या नसतात, तर वृद्ध झाल्यानंतर आपण अडगळीत पडणार नाही त्याची काळजी घेण्यासाठी हे पुस्तक प्रत्येकाने आवर्जून वाचले पाहिजे. त्यामुळे समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून सेवानिवृत्त वृद्धांच्या समस्या आणि संगीत क्षेत्रातील क्रांतीकार्य करणारे पंडित विष्णू नारायण भातखंडे यांचे सांगीतिक कार्य आणि कर्तृत्व रेखाटणारे दोन्ही ग्रंथ समाजासाठी अनमोल ठेवा डॉ. तुकाराम वांढरे यांनी लेखनाच्या माध्यमातून उपलब्ध करून दिला आहे' असे मत डॉ. समाधान इंगळे यांनी मांडले. तेडॉ. तुकाराम वांढरे लिखित 'पं. विष्णू नारायण भातखंडे: सांगीतिक कार्य आणि कर्तृत्व' तसेच 'सेवानिवृत्त वृद्धांच्या समस्या' दोन पुस्तकांच्या प्रकाशन समारंभात बोलत होते. त्यांनी दोन्ही पुस्तकांचे अभ्यासपूर्ण विवेचन करून त्यातील त्रुटी लक्षात आणून दिल्या. या लेखनाच्या माध्यमातून डॉ. तुकाराम वांढरे यांचे कार्य आणि नाव अजरामर झाले असे सांगून त्याबद्दल अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. या प्रसंगी अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. दा. धों. काचोळे हे होते. त्यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत तुकाराम वांढरे यांनी शिक्षण घेऊन आपल्या अभ्यासू वृत्तीने आपल्या कार्याचा आलेख उंचावत नेला आहे असे मत मांडले. ज्येष्ठ कवी प्रा. फ. मुं. शिंदे म्हणाले की, डॉ तुकाराम वांढरे यांनी रेखाटलेलं भातखंडे यांचं हे जीवन चरित्र संस्कारक, प्रेरक आणि उद्बोधक असं उतरलेलं आहे.नव्याने वाटचाल करणाऱ्यांना मार्गदर्शकही ठरेल. विद्या आणि कला यांच्या संगमाची समाधीस्थ अनुभूती देणारं स्थळ म्हणजे संगीत होय. प्रसिद्ध गायक प्रा. राजेश सरकटे यांनी देवगिरीच्या मातीचा टिळा कपाळी लावल्यानंतर प्रत्येक व्यक्ती जीवनात यशस्वी होतो असे प्रतिपादन केले. जन्मापासून तर मृत्यूपर्यंत संगीत मानवाला साद घालत असते त्यामुळे संगीत मानवी जीवनाला समृद्ध करते असे प्रतिपादन केले. संगीततज्ञ डॉ. वैशाली देशमुख यांनी दोन्ही ग्रंथ विद्यार्थी ,अभ्यासक, संशोधक , प्राध्यापक यांच्यासाठी संदर्भयुक्त आणि महत्त्वपूर्ण ठरणार आहेत असे मत मांडले. त्र्यंबकराव पाथ्रीकर यांनी सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांसाठी सेवानिवृत्त वृद्धांच्या समस्या हा ग्रंथ आदर्श वस्तूपाठ ठरेल असे मत मांडले. यावेळी मंचावर प्राचार्य डॉ. रवी पाटीलबाबासाहेब वांढरे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रास्ताविकात डॉ. तुकाराम वांढरे यांनी श्री सतीश चव्हाण साहेब आणि इतर मान्यवरांच्या उपस्थितीबद्दल ऋण व्यक्त केले . ग्रंथ लेखनाची प्रेरणा कशी मिळाली तसेच प्रभा प्रकाशनचे प्रकाशक अजय कांडर , दोन्ही पुस्तकांचे मुखपृष्ठ बनविणारे मुंबई येथील रजनीश कोंडविलकर , अनिल रंगारी, पुस्तकांसाठी दोन शब्द लिहिणारेपद्मश्री पंडित अनुप जलोटा, मुंबई, डॉ. जगन कराडे , कोल्हापूर, अरविंद जगताप, मुंबई, प्रा राजेंद्र गोणारकर, नांदेड, डॉ कुणाल इंगळे, मुंबई, डॉ श्रुती तांबे , पुणे ,पांडुरंग घोटकर तसेच टायपिस्ट ज्ञानेश्वर अधाने, डॉ जिजा शिंदे , डॉ कैलास ठोंबरे , प्रा माधव जाधव, प्रा. मारोती गायकवाड, प्रा संजय भोसले यांचे सहकार्य आणि मार्गदर्शनाबद्दल ऋण व्यक्त केले. सूत्रसंचालन डॉ. जिजा शिंदे यांनी केले. यावेळी उपप्राचार्य प्रा ज्ञानेश्वर हिवरे , प्रा अरुण काटे , प्रा विजय नलावडे, डॉ अपर्णा तावरे , डॉ गणेश मोहिते आणि मोठ्या संख्येने संगीत क्षेत्रातील, सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांसह प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी आणि विद्यार्थी यांची उपस्थिती होती.

## एच.पी.व्ही. लसीकरण मोहिमेचे बापुराव पाटील यांच्या शुभहस्ते उदघाट्न..

**मुरुम (प्रा.सुधीर पंचगल्ले) :** मुरूम येथील ग्रामीण रुग्णालयात दि. २० वार शुक्रवार रोजी HPV लसीकरण मोहिमेचे मुरूम नगरीचे नगराध्यक्ष बापुराव पाटील यांच्या हस्ते आरोग्य देवता धनवंत्री पूजन व द्विप्रज्वलनाने उदघाटन संपन्न झाले.याप्रसंगी उपनगराध्यक्ष रमेश चव्हाण,पंचायत समिती माजी सभापती मदन पाटील, गोविंद पाटील, माजी नगराध्यक्ष बबन बनसोडे,नगरसेवक गणेश अंबर,नगरसेवक अजित चौधरी,वैधकीय अधीक्षक डॉ. महेश अर्धाले,डॉ. शिवराज कारडामे, डॉ. नितीन डागा, डॉ. महेश जिरोळे आदींची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी माहिती देताना डॉ. अर्धाले म्हणाले HPV लस सण २०१० पासूनच वापरात असून त्या लसीपासून कोणतेही धोका नसून त्याबाबत समाजमाध्यमावर अफवा पसरविण्यात येत आहेत. गर्भशयाच्या मुखाला होणाऱ्या कर्करोगाला थांबविण्यासाठी या लसीचे मदत होते. HPV ही मानवी पॅपिलोमाव्हायरस संसर्गापासुन संरक्षण करणारी एक अत्यंत सुरक्षित आणि प्रभावी लस आहे, जी प्रामुख्याने गर्भाशयाच्या मुखाचा कर्करोगास कारणीभूत ठरू शकते. १४ ते १५ वयोगटातील मुलींसाठी ही लस सर्वोत्तम मानली जाते. ही लस लैंगिक क्रिया सुरु होण्यापूर्वी घेतल्यास सर्वाधिक संरक्षण मिळते. गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगापासून बचावासाठी हा एक अत्यंत महत्वाचा प्रतिबंधात्मक उपाय असल्याचे माहिती लसी संदर्भात मनामध्ये कसलीही शंकान बाळगता लसीकरण करून घेण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले. याप्रसंगी नगराध्यक्ष बापुराव पाटील यांनी ग्रामीण रुग्णालयातील डायलसिस सेंटर, रुग्णालयाची पाहणी केली.मुरूम शहरातील डॉक्टर असोसिएशन, पत्रकार बांधव, ग्रामीण रुग्णालय कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुजित जाधव तर आभार विजय भोसले यांनी मानले.



# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २३ मार्च २०२६

# शहीद दिन : अमर बलिदानाची प्रेरणादायी गाथा - डॉ. राजेंद्र बगाटे



२३ मार्च हा दिवस भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासात अत्यंत महत्त्वपूर्ण, हृदयस्पर्शी आणि प्रेरणादायी असा दिवस म्हणून नोंदवला गेला आहे. या दिवशी भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव या तीन तरुण क्रांतिवीरांनी आपल्या आयुष्याचा सर्वात मौल्यवान ठेवा आपले प्राण भारताच्या स्वातंत्र्यासाठी अर्पण केले. त्यांच्या या बलिदानाने संपूर्ण देशाला एक नवी दिशा दिली आणि स्वातंत्र्यलढ्याला अधिक तीव्र गती प्राप्त करून दिली. म्हणूनच हा दिवस केवळ शोक व्यक्त करण्याचा नाही, तर देशभक्ती, त्याग आणि स्वाभिमान यांचा जागर करणारा दिवस आहे.भारतीय स्वातंत्र्यलढा हा अनेक शतकांच्या संघर्षाचा परिपाक होता. परकीय सत्तेच्या जोखडाखाली दबलेल्या भारतभूमीला स्वातंत्र्याची आस लागली होती. अनेकांनी विविध मार्गांनी या लढ्यात सहभाग घेतला. काहींनी अहिंसेचा मार्ग स्वीकारला, तर काहींनी सशस्त्र क्रांतीचा मार्ग निवडला. या सर्व प्रयत्नांचा उद्देश एकच होता तो म्हणजे भारताला स्वातंत्र्य मिळवून देणे. या पार्श्वभूमीवर भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव यांचे योगदान अत्यंत मोलाचे ठरते.भगतसिंग यांचे बालपण देशभक्तीच्या वातावरणात गेले. त्यांच्या कुटुंबात स्वातंत्र्यलढ्याची परंपरा होती. लहानपणापासूनच त्यांनी देशासाठी काहीतरी मोठे करण्याचा निर्धार केला होता. जालियनवाला बाग हत्याकांडाने त्यांच्या मनावर खोल परिणाम केला. त्या अमानुष घटनेने त्यांच्या अंतःकरणात ब्रिटिश सत्तेविरुद्ध तीव्र संताप निर्माण केला. त्यांनी शिक्षण घेत असतानाच क्रांतिकारक संघटनांमध्ये प्रवेश केला आणि देशाच्या स्वातंत्र्यासाठी आपले जीवन अर्पण करण्याचा संकल्प केला.राजगुरू हे अत्यंत धाडसी आणि साहसी होते. त्यांच्या नेमबाजीचे कौशल्य अतुलनीय होते. त्यांनी आपल्या कौशल्याचा उपयोग देशाच्या स्वातंत्र्यासाठी केला. त्यांची निष्ठा आणि धैर्य पाहून सहकारी क्रांतिकारक त्यांच्यावर विश्वास ठेवत. सुखदेव हे बुद्धिमान आणि संघटन कौशल्य असलेले होते. त्यांनी युवकांना एकत्र आणून क्रांतीचा पाया मजबूत केला. या तिघांच्या एकत्रित प्रयत्नांमुळे स्वातंत्र्यलढ्याला एक नवी दिशा मिळाली.लाला लाजपतराय यांच्या मृत्यूचा बदला घेण्यासाठी त्यांनी सॉंडर्सचा वध केला. हा केवळ बदला नव्हता, तर तो अन्यायाविरुद्धचा एक ठाम प्रतिकार होता. या कृतीने ब्रिटिश सत्तेला स्पष्ट संदेश दिला की भारतीय तरुण अन्याय सहन करणार नाहीत. या घटनेने संपूर्ण देशात एक नवा उत्साह निर्माण झाला.यानंतर त्यांनी केंद्रीय विधानसभेत बॉम्ब टाकण्याची योजना आखली. या कृतीमागील उद्देश हिंसाचार नव्हता, तर ब्रिटिश सत्तेला जागृत करणे हा होता. त्यांनी बॉम्ब टाकल्यानंतर पळून जाण्याऐवजी स्वतःहून अटक दिली. या कृतीने त्यांच्या धैर्याचे आणि प्रामाणिकतेचे दर्शन घडले. त्यांनी न्यायालयात आपल्या विचारांची प्रभावी मांडणी केली.कारागृहात असताना त्यांनी कैद्यांच्या हक्कांसाठी संघर्ष केला. त्यांनी उपोषण करून अन्यायकारक वागणुकीचा निषेध केला. त्यांच्या या संघर्षामुळे संपूर्ण देशाचे लक्ष या समस्येकडे वेधले गेले. त्यांनी आपल्या शरीराला त्रास सहन करूनही आपले तत्त्व सोडले नाही.भगतसिंग हे केवळ क्रांतिकारक नव्हते, तर ते एक विचारवंतही होते. त्यांनी समाजातील विषमता, अंधश्रद्धा आणि अन्याय यांविरुद्ध आवाज उठवला. त्यांच्या लेखनातून त्यांच्या विचारांची प्रगल्भता दिसून येते. त्यांनी युवकांना जागृत करण्याचे कार्य केले.२३ मार्च १९३१ रोजी या तिघांना फाशीची शिक्षा देण्यात आली. ही शिक्षा नियोजित वेळेपेक्षा आधी देण्यात आली, जेणेकरून जनतेचा उद्रेक टाळता येईल. पण त्यांच्या मृत्यूने उलट जनतेचा संताप अधिक वाढवला. त्यांच्या बलिदानाने स्वातंत्र्यलढ्याला नवी ऊर्जा मिळाली.या तिघांच्या बलिदानामुळे भारतीय समाजात एक नवीन चेतना निर्माण झाली. त्यांनी दाखवून दिले की स्वातंत्र्य मिळवण्यासाठी त्याग आणि संघर्ष आवश्यक आहे. त्यांच्या जीवनातून आपल्याला देशप्रेम, धैर्य आणि निष्ठा यांचे महत्त्व समजते.आजच्या काळात त्यांच्या विचारांची अधिक गरज आहे. समाजात वाढत चाललेली असमानता, अन्याय आणि भ्रष्टाचार यांविरुद्ध लढण्यासाठी त्यांच्या विचारांची प्रेरणा आवश्यक आहे. त्यांनी ज्या मूल्यांसाठी आपले जीवन अर्पण केले, ती मूल्ये जपणे ही आपली जबाबदारी आहे.शहीद दिन हा केवळ स्मरणाचा दिवस नाही, तर तो आत्मपरीक्षणाचा दिवस आहे. आपण त्यांच्या बलिदानाचा सन्मान कसा करतो, हे महत्त्वाचे आहे. त्यांच्या विचारांचे आचरण करणे, समाजासाठी कार्य करणे आणि देशाच्या प्रगतीसाठी योगदान देणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल.भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव यांचे बलिदान हे भारतीय इतिहासातील अमर अध्याय आहे. त्यांच्या त्यागामुळेच आज आपण स्वातंत्र्याचा आनंद घेत आहोत. त्यांच्या स्मृती सदैव आपल्या हृदयात जिवंत राहतील.आजच्या तरुण पिढीने त्यांच्या जीवनातून प्रेरणा घेणे अत्यंत आवश्यक आहे. त्यांनी आपल्या आयुष्याच्या अत्यंत तरुण वयात जे कार्य केले, ते अभूतपूर्व आहे. त्यांनी व्यक्तिगत सुखाचा त्याग करून राष्ट्रहिताला प्राधान्य दिले. त्यांच्या या त्यागातून आपल्याला प्रेरणा मिळते.स्वातंत्र्य टिकवण्यासाठी सतत जागरूक राहणे आवश्यक आहे. समाजातील अन्याय, भ्रष्टाचार आणि असमानता यांविरुद्ध लढणे हीच खरी देशभक्ती आहे. भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव यांच्या आदर्शांचे पालन करून आपण समाज आणि देशाच्या प्रगतीसाठी योगदान देऊ शकतो.शेवटी, या महान क्रांतिकारकांच्या स्मृतींना अभिवादन करताना आपण त्यांच्या विचारांचे पालन करण्याचा संकल्प केला पाहिजे. त्यांच्या बलिदानाची ज्योत आपल्या हृदयात सदैव प्रज्वलित ठेवली पाहिजे. हाच त्यांच्या प्रति खरा आदर आणि कृतज्ञतेचा भाव ठरेल.



**डॉ. राजेंद्र बगाटे (लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत), ईमेल - bagate.rajendra5@gmail.com**

# सावळसूर येथे शरण पाटील यांच्या शेत पाणंद रस्त्याचा शुभारंभ



**मुरुम (प्रा.सुधीर पंचगल्ले) :** निवडणुकीच्या काळात दिलेले आश्वासन पूर्ण करत, विधानसभा समितीचे सह-अध्यक्ष शरण बसवराज पाटील यांच्या हस्ते उमरगा तालुक्यातील सावळसूर येथे शरण पाटील फाउंडेशनच्या माध्यमातून शेत पाणंद रस्त्याचे भव्य भूमिपूजन संपन्न झाले. जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या प्रचारादरम्यान सावळसूर येथील पाणंद रस्त्याचा प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन शरण पाटील यांनी ग्रामस्थांना दिले होते. आज या कामाचा प्रत्यक्ष शुभारंभ झाल्याने सावळसूर परिसरातील शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.याप्रसंगी बोलताना शरण पाटील म्हणाले की, "शरण पाटील फाउंडेशनच्या माध्यमातून उमरगा आणि लोहारा तालुक्यात आम्ही पाणंद रस्त्यांचे जाळे विणले असून, हे काम भविष्यातही अविरत सुरू राहील. मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस आणि महसूल मंत्री चंद्रशेखरजी बावनकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली या रस्त्यांसाठी आवश्यक तो निधी उपलब्ध करून देऊन हा रस्ता सर्वांगीण सक्षम करण्याचा आमचा प्रयत्न आहे. उमरगा-लोहारा तालुक्यात राबविलेल्या या बळीराजा शेत पाणंद रस्ते योजनेचा एक आदर्श 'पॅटर्न' संपूर्ण महाराष्ट्रासाठी सेट करू," असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.सावळसूर ते चिरेवाडी आणि आकाश इंगळे यांच्या शेतापासून ते दगडू येमगर यांच्या शेतापर्यंतचा हा सुमारे 2 किलोमीटर लांबीचा रस्ता केवळ शेतकऱ्यांसाठीच नाही, तर सावळसूर, चिरेवाडी आणि आजूबाजूच्या अनेक गावांसाठी दळणवळणाची महत्त्वाची वाहिनी ठरणार आहे. या रस्त्यामुळे अनेक वर्षांपासूनचा वाहतुकीचा प्रश्न सुटणार असून शेतीमालाच्या वाहतुकीला मोठी गती मिळणार आहे.या कार्यक्रमासाठी भाजप अनुसूचित जाती मोर्चाचे जिल्हाध्यक्ष दिलीप भालेराव, जिल्हा परिषद सदस्य रफिक तांबोळी, तंटामुक्त अध्यक्ष श्याम चिंचोळे, योगेश राठोड, माजी सभापती सचिन पाटील, आकाश इंगळे, प्रेमनाथ सूर्यवंशी, कमलाकर पाटील, ज्ञानेश्वर पाटील, बाबुराव सूर्यवंशी, भास्कर बोधे, शाहूराज सूर्यवंशी यांच्यासह सावळसूर व परिसरातील नागरिक आणि शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.